**कृपया प्रसिद्धीसाठी** **23 डिसेंबर 2011**

## प्रकाश जावडेकर यांच्या खासदार निधीतून भटक्या विमुक्तांसाठी मागठाणे येथे व्यायामशाळा व संस्कार केंद्र

**मुंबई,शुक्रवार:**"महाराष्ट्रातील 15 टक्के जनता भटक्या - विमुक्त जातींची आहे, परंतु त्यांच्या विकासासाठी आज प्रथमच मुंबईसारख्या महानगरीत व्यायामशाळा होते आहे. ही सर्वसाधारण व्यायामशाळा नव्हे तर भटक्या-विमुक्तांना सक्षम-सशक्त बनविण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे", असे गौरवोद्‌गार खासदार श्री. प्रकाश जावडेकर यांच्या खासदार निधीतून बोरीवलीत मागठाणे येथे बनलेल्या व्यायामशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी अखिल भारतीय समरसता मंचचे संयोजक श्री. दादा इदाते यांनी काढले. भाजपाचे प्रवक्ता व खासदार श्री. प्रकाश जावडेकर यांच्या खासदार निधीप्रमाणेच दिवंगत खासदार श्री. वेदप्रकाश गोयल, माजी समाजकल्याण मंत्री श्री. भाई गिरकर यांनीही यासाठी निधी दिला, याचे कारण म्हणजे ही व्यायामशाळा उभारण्यासाठी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी घेतलेला पुढाकार हेच आहे, असेही यावेळी श्री. इदाते यांनी आवर्जून नमूद केले.

"पारंपारीकरीत्या पाठीवर घरं घेऊन हिंडणा-या भटक्या-विमुक्त समाजाची दुःखं इतरांपेक्षा खूप वेगळी आहेत. विखुरलेल्या या समाजाला एकत्र आणण्यासाठी व्यायामशाळा व संस्कार केंद्राची ही वास्तु महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे. या व्यायामशाळेचे व्यवस्थापन सरोदे समाजाच्या सरोदे उन्नती मंडळाकडे देण्यात आले आहे. मंडळाचे अध्यक्ष श्री. सहदेव रसाळ व महाराष्ट्र भाजपा युवा मोर्चाचे सचिव श्री. गणेश खणकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे ही व्यायामशाळा आज होऊ शकली. माझ्या विनंतीला मान देऊन श्री. प्रकाश जावडेकर यांनी त्यासाठी निधी दिला याबद्दल मी ऋणी आहे", असे उद्‌गार यावेळी बोलताना माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी काढले. भाजपा नगरसेविका श्रीमती भारती केणी-शृंगारपुरे यांनीही या व्यायामशाळेला विंधन विहीरीद्वारा पाणी पुरविण्यासाठी महापालिका निधीतून दोन लाख रुपये उपलब्ध करुन दिल्याची माहितीही श्री. नाईक यांनी दिली.

उपमहापौर श्रीमती शैलजा गिरकर, भाजपाच्या अनुसूचित जातीजमाती मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस श्री. रमेश मेढेकर, माजी आमदार श्री. हेमेंद्र महेता, भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. जगदीश पटेल यांचीही यावेळी भाषणे झाली. भटके विमुक्त विकास परिषदेशी संलग्न सरोदे समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष श्री. सहदेव रसाळ यांनी यावेळी प्रास्ताविक केले तर श्री. गणेश खणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स्थानिक नागरिकांबरोबरच मुंबईतील शेकडो भटके-विमुक्त विशेषतः सरोदे समाजाचे लोक तसेच नगरसेवक सर्वश्री मोहन मिठबावकर, प्रवीण शहा, अशोक शहा, नगरसेविका श्रीमती भारती केणी-शृंगारपुरे, सर्वश्री जयप्रकाश ठाकुर, करुणाशंकर ओझा, उत्तम अग्रवाल, जयप्रकाश मिश्रा, श्रीकांत पांडे, दिलीप पंडित, सुनिल चव्हाण, माजी नगरसेविका श्रीमती हर्षवीणा साटम, सेना विभाग संघटक रश्मि भोसले, आदी मान्यवरही कार्यक्रमाला उपस्थित होते.

**(अध्यक्ष)**